classmate
Page 9

# महत्व तुळशीचे

घर म्हटलं की प्रत्येकाच्या डोळ्यासमोर घरांची विविध रूपे साकारतात. चौसोपी घर, झोपडीवजा घर, चाळ, बंगला, आणि सदनिका इ. अंगण असेल तर विविध प्रकारची झाडे उदा. आंबा, पेरू, चिकू, शेवगा, केळी, फुलझाडे परंतु जागेच्या अभावातही सगळीकडे एक अशी वनस्पती आहे जी सगळ्यांच्या घरात (खिडकीत जागा करून) गच्चीत, अंगणात आढळते आणि ती म्हणजे सगळ्यांच्या आवडीची "तुळस"!! अगदी आल्यागेल्याचं, पाहुण्यांचं आनंदाने स्वागत करणारी ही तुळस जन्मापासून मृत्युपर्यंत साथसोबत करते. तुळस म्हणजे नुसतं एक रोपटं (झाड) नाही तर मांगल्याचं प्रतीक आहे.

तुळशीचे राम तुळस, कृष्ण तुळस, कापूर तुळस, औषधी तुळस, रान तुळस असे अनेक प्रकार आहेत. हिरव्या पानांच्या तुळशीला "श्री किंवा लक्ष्मी" तुळस म्हणतात. काळ्या पानांच्या तुळशीला "कृष्णतुळस" म्हणतात. घरात शुद्धीकरण करतांना गोमुत्रासोबत तुळशीच्या पानांचा उपयोग केला जातो. देवाला दाखवल्या जाणाऱ्या नैवेद्यावर आणि पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणाला दक्षिणा देतेवेळी त्यावर तुळशीचं पान ठेवलं जातं. तुळस ही पुर्तता देणारी असल्यामुळे कोणत्याही गोष्टीची सांगता तुळसी दलाने होते.

तुळशीचं सोबत असणं स्त्रियांना आश्वस्त करतं. वारीला जाणाऱ्या स्त्रिया आपल्यासोबत तुळशीवृंदावन घेऊन चालतात. तुळस हीच खरी स्त्रीची जीवाभावाची सखी असते; तिच्याशी ती मनातले दुःख, आनंद, संवादाच्या रूपाने व्यक्त करू शकते. तुळशीला केवळ वनस्पतीचं स्थान नाही तर तिचं स्थान कुटुंबातील सदस्याप्रमाणे असतं. म्हणूनच दरवर्षी तिचं विधीवत लग्न लावलं जातं. धार्मिक कार्यात तर तुळशीचा उपयोग होतोच, पण बोलीभाषेतही 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' या सारख्या म्हणीतून तुळस विराजमान आहे.

लुब्धाम तुळशीची एक आख्यायिका सांगते - तुळशी नावाची एक ब्राह्मणकन्या होती. काही कारणामुळे तिला घराबाहेर हाकलल्या गेले, शेवटी ती आश्रयाला म्हणून श्रीविठ्ठलाकडे आली. उभयतांमध्ये प्रेम निर्माण झाला असावा, असा संशयाने रुक्मिणीला चैन पडेना - विठ्ठलाला जाब विचारण्यापूर्वी तिने तुळशीच्या मनात त्याच्याविषयी संशय निर्माण केला आणि दोघांमध्ये दुरावा आला - बिचारी

तुळशी भूमीच्या उदरात जावू लागली. विठ्ठलाने तिला वाचवण्याचा प्रयत्न केला; पण ती धरणीच्या कुशीत समावत होती. मात्र विठ्ठलाचा स्पर्श तिच्या केसांना झाला. पुढे हिच तुळशी त्या मातीत रुजली आणि रोप होवून उगवली. तेव्हा तिच्या केसांचं रुपांतर मंजि-यांमध्ये झालं. मागील जन्मात तिच्या केसांना विठ्ठलस्पर्श झाला असल्याने मंजि-यांना सुगंध येता झाला; परंतु मनातली अढी दूर झाली नसल्याने तिची पाने किंचित तुरट आणि तिखट चवीचीच राहिली. विठ्ठलाला म्हणूनच तुळशीचा हार प्रिय आहे.

या कथेत 'सत्य' आणि 'तथ्य' किती हे त्या विठ्ठलाला आणि तुळशीलाच माहीत परंतु माणसाच्या आयुष्याला पुरुन उरणारी अशी ही तुळस आहे. तिचं महत्व काल-आज आणि उद्याही असंच राहणार आहे. पुराणात ती 'विष्णूप्रिया' आणि कलियुगात ती 'जनप्रिया' आहे. परिसरातील तुळशीच्या रोपांमुळे नकारात्मक लहरींचे शोषण होते. डासांना प्रतिबंध होतो. आजारपणामुळे आलेला अशक्तपणा तुळशीच्या पानांच्या काढ्यामुळे दूर होवून प्रतिकारक्षमता वाढते. आंघोळीच्या पाण्यात तुळशीची पाने टाकल्यास शरीर निरोगी बनते आणि आनंदी वृत्तीची जोपासना होते.

अशा या बहुउपयोगी तुळशीच्या गुणांमुळे आपण आपली आरोग्य संस्कृती जपण्याचा प्रयत्न करूया !!



सौ. विजया पुरुषोत्तम जोशी

